पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १२ /२०२३ दि. २१/०१/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** भिवंडी निजामपूरा शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात **भिवंडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील मुख्य रस्त्यावर दि. २२/०१/२०२४ रोजी **'राम मंदिर प्राणप्रतिष्ठा'** निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमास विविध मान्यवर तसेच असंख्य भाविक उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुंबई, ठाणे कडून जुना ठाणे आग्रा रोडने छत्रपती शिवाजी महाराज चौक कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड, मध्यम वाहनांना **संतोष ज्युस सेंटर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर जड, अवजड, मध्यम वाहने संतोष ज्युस सेंटर कडून भाजी मार्केट, तीनबत्ती, क्वार्टर गेट मस्जिद मार्गे स्व. आनंद दिघे चौक व पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) खाडीपार कडून भिवंडी शहर कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड, मध्यम वाहनांना **अजयनगर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर जड, अवजड, मध्यम वाहने अजयनगर, गाजेंगी हॉल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) मुंबई, ठाणे आग्रा रोडने छत्रपती शिवाजी महाराज चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड, मध्यम वाहनांना **वंजारपट्टी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर जड, अवजड, मध्यम वाहने वंजारपट्टी नाका कडून मेट्रो हॉटेल – गाजेंगी हॉल – अजयनगर मार्गे खाडीपार कडे जातील. तसेच सर्व महानगरपालिकेच्या बसेस वंजारपट्टी नाका येथून वळण घेवून पुढे कल्याण, ठाणे कडे जातील.

**नो पार्किंग –** दि. २२/०१/२०२४ रोजी सायंकाळी १६:०० ते रात्रौ २२:०० वाजेपावेतो छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात रस्त्याचे दोन्ही बाजूस कोणतीही वाहने उभी करण्यास सक्त मनाई आहे.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २२/०१/२०२४ रोजी सायंकाळी १६:०० ते रात्रौ २२:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, निजापूर शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी** :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष ,ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उप विभाग ठाणे.